# रे.दि.मु.नं. १३५/२०१६ मधील नि.५० खालील आदेश

(शंकर गणु सरगर वि. तुकाराम गणु सरगर–६)
CNR No.MHSO20-002677-2015

प्रस्तुत अर्ज वादी यांनी निशाणी ३४ वर पारित झालेल्या आदेशाची पूर्तता करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीचे कथनानुसार, वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द सरस निरस मानाने वाटप होऊन मिळणे बाबतचा दाखल केलेला आहे. दाव्यात मयत वादी यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकामी नि.३४ वर आदेश पारित झालेला आहे. परंतु सदरील आदेशाप्रमाणे मुदतीत वारस रेकॉर्डवर घेण्याचे अनावधानाने राहून गेलेले आहे. वादीने सदर अर्जाद्वारे नि.३४ वरील आदेशाची पूर्तता करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली.

३. सदर अर्जास प्रतिवादीतर्फे म्हणणे दिले की, सदरील अर्ज खोटा व बनावट असून नामंजूर होणेस पात्र आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. सदरच्या अर्जावर दोन्हीं वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दाव्यातील मागणी पाहता वादाचा विषय गुणदोषांवर निर्गत होणे आवश्यक आहे. प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता, निशाणी ३४ कडील आदेशामध्ये सदर आदेशाची पूर्तता आदेश पारित केल्याच्या १४ दिवसांच्या आत करण्याचे आदेश दिलेले आहे. वादीने सदर आदेशाची मुदतीत पूर्तता केली नाही. सदर दावा हा स्थावर मिळकती संबंधीचा आहे. दोन्ही पक्षकारांचे हित त्यात गुंतलेले आहेत. त्यासाठी दोन्हीं पक्षकारांना योग्य ती संधी देणे आवश्यक आहे. सदर अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट, दावा गुणदोषांवर निर्गत होणेस मदतच होईल. परंतु वादीने केलेला विलंब लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यासाठी विलंबाचा खर्च त्याच्यावर ठेवणे योग्य आहे. सबब, खालीलप्रमाणे

आदेश करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज (नि.५०) वादी यांनी रक्कम रु. २००/- (रुपये दोनशे फक्त) एवढे पुढील तारखेपर्यंत प्रतिवादींना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. निशाणी ३४ कडील आदेशाप्रमाणे मयत वादी यांचे वारसांना दाव्यात सामील करण्याची परवानगी देण्यात येते.

BHAGYASHRI MADHUKAR POTDAR
Digitally signed by BHAGYASHRI MADHUKAR POTDAR
Date: 2022.06.29 11:50:43 +0530

सांगोला. (सौ. बी. मधुकर पोतदार)

दिनांक: २८/०६/२०२२. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सांगोला

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Mrs. B. M. Potdar,<br>2nd Jt. Civil Judge,<br>J.D.& J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 29.06.2022 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 29.06.2022 |